Ubhadanda long GR her website

REV- 3001/15/2016
जिल्हाधिकारी कार्यालय, सिंधुदुर्ग
सिंधुदुर्गनगरी. दि. 31/08/2016.

वाचले:-

1) मा. मुख्य वन संरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई यांचेकडील पत्र क्र.ADMIN/445 दिनांक 22/12/2015.
2) तहसिलदार वेंगुर्ला यांचेकडील पत्र क्र. REV-14/8/2014 TAHVEN दिनांक 25/1/2016.
3) मा. व्यवस्थापकीय संचालक, मपविम., मुंबई यांचेकडील आदेश क्र. मपविम/जवमा/उभादांडा/2016 / 2976 दिनांक 12/05/2016.
4) वनक्षेत्रपाल, कांदळवन कक्ष 1 मुंबई (स्थित मालवण) यांचेकडील पत्र क्र. मोजणी/148/2015-16 दिनांक 29/08/2016.
5) जिल्हाधिकारी रत्नागिरी यांचेकडील आदेश क्र. RB/LND/II 2874 दिनांक 27/5/1974.
6) महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनीची विल्हेवाट लावणे) नियम, 1971 चा नियम 6 अ.

आदेश:-

सिंधुदुर्ग जिल्हयात खेकडा हॅचरी प्रकल्प राबविणेसाठी मौजे वाघेश्वर (उभादांडा) ता.वेंगुर्ला येथील सर्व्हे नंबर 47 हि.नं. 0 क्षेत्र 3.48.00 हे. आर शासकीय जमीन उपलब्ध करुन देणेबाबत प्रस्ताविकेतील अ.क्र. 1 अन्वये मुख्य वन संरक्षक कांदळवन कक्ष आणि नोडल अधिकारी ,सिंधुदुर्ग यांनी मागणी केलेली आहे. प्रस्तुत प्रकरणी प्रस्ताविकेतील अ.क्र. 2 अन्वये तहसिलदार वेंगुर्ला यांचेकडील अहवाल या कार्यालयाकडे प्राप्त झालेला असून त्याबाबतची वस्तुस्थिती खालील प्रमाणे आहे.

मौजे वाघेश्वर (उभादांडा) ता.वेंगुर्ला येथील सर्व्हे नंबर 47 हि.नं. 0 क्षेत्र 3.48.00 हे. आर शासकीय जमीन प्रस्ताविकेतील अ.क्र. 5 अन्वये पर्यटन केंद्र उभारणेसाठी पर्यटन विकास महामंडाळास अटी व शर्तीवर वर्ग करण्यात आलेली असून दिनांक 22/6/1974 रोजी त्यांचे ताब्यात दिलेली आहे. सदर मिळकतीच्या 7/12 चे कब्जेदार सदरी महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ व इतर हक्क सदरी श्री.देव लिंग (सागरेश्वर) यांचे देवालय व आवार अशी नोंद आहे. सदर जमिनीच्या क्षेत्र 3.48.00 हे.आर पैकी 0.15.00 हे. आर इतक्या जमिनीत सागरेश्वर मंदिर व सार्वजनिक स्मशानभूमी आहे. तसेच सुरुच्या झाडांची लागवड सामाजिक वनीकरण विभागाने केली आहे.

सदर जमिन हस्तांतरण प्रकरणी आदेशातील शर्त क्रमांक 1 अन्वये पर्यटन खात्याला ही जमीन पर्यटन केंद्र उभारण्यासाठी दिलेली असून या कामासाठी उपयोग होत असेपर्यंत सदरची जमीन त्यांचे ताब्यात राहील अशी अट होती.

प्रस्ताविकेतील अ.क्र. 4 अन्वये वनक्षेत्रपाल, कांदळवन कक्ष 1 मुंबई (स्थित मालवण) यांनी मागणी केले प्रमाणे मौजे वाघेश्वर (उभादांडा) ता.वेंगुर्ला येथील सर्व्हे नंबर 47 हि.नं. 0 क्षेत्र 3.48.00 हे. आर पैकी 1.25.00 हे. आर क्षेत्राची पोटहिस्सा मोजणी मो.र.नं. 137 दिनांक 3/8/2016 नुसार मोजणी करून मोजणी नकाशाची क प्रत सादर केलेली आहे. त्यानुसार स.नं. 47 हि.नं. 0 क्षेत्र 3.48.00 हे. आर मध्ये 47 अ क्षेत्र 1.25.00 हे. आर व उर्वरित 47 ब क्षेत्र 2.23.00 हे. आर दर्शविणेत आलेले आहे. महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनीची विल्हेवाट लावणे) नियम, 1971 चा नियम 6अ मधील तरतुदीनुसार जमीन देणेचे अधिकार जिल्हाधिकारी यांना आहेत.

प्रस्ताविकेतील अ.क्र. 3 अन्वये सर्व्हे नंबर 47 हि.नं. 0 क्षेत्र 3.48.00 हे. आर क्षेत्रापैकी सुमारे 1.25.00 हे. आर जमीन मा. मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई यांना रु.1/- नाममात्र भाडेपट्ट्याने आगाऊ ताबा देण्यासाठीचा प्रस्ताव मा. अध्यक्ष (मपविम) तथा मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांची मान्यता घेऊन व्यवस्थापकीय संचालक, मपविम, मुंबई यांनी क्र. मपविम/जवमा/उभादांडा/ 2016/ 2976 दिनांक 12/05/2016 अन्वये अटी व शर्तीवर मंजुरी आदेश दिले आहे.

सबब, मी उदय चौधरी, जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग मला प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करून खालील अटी व शर्तीवर मौजे वाघेश्वर (उभादांडा) ता.वेंगुर्ला येथील सर्व्हे नंबर 47 हि.नं. 0 क्षेत्र 3.48.00 हे. आर पैकी 47 अ 1.25.00 हे. आर क्षेत्र "मा. मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई" यांना खेकडा हॅचरी प्रकल्प (खेकडे, शिंपले, कालवे इ. अंडी उबवण केंद्र) राबविणेसाठी रु.1/- नाममात्र भाडेपट्ट्याने देणेसाठी मंजुरी देत आहे.

<u>अटी व शर्ती-</u>

1) मा. व्यवस्थापकीय संचालक, मपविम, मुंबई व मा. मुख्य वन संरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई यांनी प्रस्तुत प्रकरणी आपापसात करार करून करार पत्राची प्रत एक महाच्या आत या कार्यालयास सादर करावी.
2) विषयांकित जमीन भोगवटदार वर्ग 2 धारणाधिकाराखाली राहील.
3) भोगवटदार सदरी महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ यांचे नाव ठेऊन इतर हक्कात "मा. मुख्य वनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई यांना नाममात्र भाडे रु. 1/- या दराने" असा शेरा ठेवण्यात यावा.
4) जमीनीचे स्थान दर्शविणारा नकाशा सोबत आहे, त्याप्रमाणे जमीनीचे स्थान असेल.
5) मा. मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई यांना यापुढे जमीन घेणारा (प्रतिग्रहिता) असे संबोधण्यात येईल.
6) जमीनीचा वापर मंजूर प्रयोजनासाठी करणेचा आहे. अन्य प्रयोजनासाठी वापर केल्यास जमीन काढून घेऊन शासन नावे केली जाईल.
7) सदर जमीनीवर कोणतेही अतिक्रमण होणार नाही, याची प्रतिग्रहिता यांनी दक्षता घेणेची आहे. अतिक्रमण झाल्यास ते हटविण्याची जबाबदारी प्रतिग्रहिता यांची राहील.

8) भविष्यात शासनास आवश्यकता भासल्यास सदर जागा किंवा जागेचा काही भाग शासनास परत करणे आवश्यक राहील.

9) सदर जमीनीतील कोणतेही झाडे जिल्हाधिकारी यांचे पुर्व परवानगी शिवाय तोडता येणार नाहीत अगर झाडांची विल्हेवाट लावता येणार नाही.

10) जिल्हाधिकारी रत्नागिरी यांचेकडील मुळ आदेश क्र. RB/LND/II 2874 दिनांक 27/5/1974 मधील अटी व शर्ती कायम राहतील.

(उदय चौधरी)
O/C
जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग.

प्रत-1) मा. मुख्य वन संरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई यांचेकडे माहितीसाठी व पुढील आवश्यक त्या कार्यवाहीसाठी सविनय सादर.

2) मा. विभागीय आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई यांचेकडे माहितीसाठी सविनय सादर.

3) मा. व्यवस्थापकीय संचालक, मपविम, मुंबई यांचेकडे माहितीसाठी व आवश्यकत्या कार्यवाहीसाठी सविनय सादर.

4) उपविभागीय अधिकारी, सावंतवाडी यांचेकडे माहितीसाठी व पुढील आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

5) तहसिलदार वेंगुर्ला यांचेकडे माहितीसाठी व पुढील आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

6) प्रकल्प अधिकारी, प्रादेशिक कार्यालय, मपविम, सिंधुदुर्ग यांचेकडे माहितीसाठी व आवश्यकत्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

7) उप अधीक्षक, भूमि अभिलेख, वेंगुर्ला यांचेकडे माहितीसाठी व पुढील आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

(उदय चौधरी)
O/C
जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग.